कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१११६/(४४२/२०१६)/भाग-५/आ.(वर्ग-१)..(१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख: ११ मे, २०१८.

शासन आदेश :-

जलसंपदा विभागातील पुढील उप विभागीय अभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर रुपये १५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००) या वेतनश्रेणीत खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ **तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.महेश भिकाजी कानिटकर (ज्ये.क्र.१६) (अ.जा.)
२. श्री.सुधाकर नागेशराव ऐवळे (ज्ये.क्र.१७) (अ.जा.)

२. वर नमूद अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

१) सदर तदर्थ पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२) वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही उप विभागीय अभियंता संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून ज्येष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

३) त्यांना देण्यात आलेली ही पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

३. पदोन्नत झालेल्या वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.महेश भिकाजी कानिटकर	उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.	उप अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे.	रिक्त पदी.
२.	श्री.सुधाकर नागेशराव ऐवळे	उप विभागीय अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे.	कार्यकारी अभियंता तथा पदसिध्द अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.	रिक्त पदी. (विनंतीनुसार)

४. सदर अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५ नुसार महसूली विभागाचे वाटप करण्यात आलेले आहे.

५. सदर अधिकाऱ्यांची पदोन्नती ५०/५५ च्या वर्षाच्या पुनर्विलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहील.

६. सदर पदोन्नत अधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे/नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहीत धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र.११/८९/बारा, दि.३०.०४.१९९१ मधील तरतूदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

७. वरील पदोन्नत अधिकारी हे नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०५१११५५१२८००२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.05.11 15:53:05 +05'30'

(सु.गं.गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.

२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.

३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)/ सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
८) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई .
९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१०) सर्व अधीक्षक अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग.
११) संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१२) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
१३) खाजगी सचिव, मा.मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
१४) खाजगी सचिव, मा.मंत्री (जलसंधारण), मंत्रालय, मुंबई.
१५) खाजगी सचिव, मा.राज्य मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
१६) संबंधीत अधिकारी. (कार्यालय प्रमुखामार्फत)
१७) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१८) सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१९) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.